# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्र. १००३६, मुंबई–४०० ००१. फोन नं.: 022-22620603/604/293; फॅक्स: 022-22659235

Website: http://admission.dvet.gov.in; www.devt.gov.in; itiadmission@dvet.maharashtra.gov.in


## शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०१५ सत्रासाठी प्रवेश सूचना

## GOVERNMENT & PRIVATE ITI ADMISSION NOTIFICATION FOR AUGUST 2015 SESSION

(Admission Notification No. : 2015/01 Dated 05th June 2015)

# http://admission.dvet.gov.in

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०१५ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (Centralized Online Admission Process) पद्धतीने करण्यात येत असून प्रवेशाची सविस्तर माहितीपुस्तिका भाग १ – प्रवेश पद्धती व नियमावली सर्व शासकीय व खाजगी औ. प्र. संस्थांमध्ये दि. ०५ जून, २०१५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. (किंमत रु. ३०/– मात्र)

**अर्ज करण्याची पद्धत :**

१. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रवेश प्रक्रियेत सहभागी असून प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्र असतील. अर्ज स्वीकृती केंद्रात उमेदवार माहितीपुस्तिका प्राप्त करू शकतात. तसेच ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे / पडताळणी / स्वीकृती आणि निश्चिती करू शकतात.

२. प्रवेशोच्छुक उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती व प्रवेशाबाबतच्या पद्धती व नियमांचा अभ्यास करूनच ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करावा.

३. ऑनलाईन प्रवेश अर्ज http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर दि. ०५ जून, २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४. ऑनलाईन अर्ज कुठल्याही स्त्रोतामधून भरता येईल. अर्ज स्वीकृती केंद्र उमेदवाराकडून माहिती पुस्तिकेतील प्रपत्र–४ मध्ये नमूद शुल्क आकारुन ही सुविधा उपलब्ध करून देऊ शकतात.

५. ऑनलाईन अर्जात सर्व माहिती भरल्यानंतर उमेदवारांचे प्रवेश खाते (Admission Account) त्यांचा नोंदणी क्रमांक (Registration Number) हाच User ID म्हणून तयार होईल. उमेदवाराने पुढील प्रवेश प्रक्रियेकरिता संकेतस्थळावर प्रवेश (Login) करून या खात्यामध्ये त्याचा नोंदणी क्रमांक (Registration Number) व पासवर्ड (Password) या उपयोग करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

६. ऑनलाईन प्रवेश अर्जात संपूर्ण माहिती सादर करावी व प्रवेश अर्ज पूर्ण भरल्यानंतर प्रवेश अर्जाची छापिल प्रत (Print Out) घ्यावी.

७. **प्रवेश अर्ज निश्चित करणे (Confirmation)**: सदर प्रवेश छापिल प्रत (Print Out), उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या पुष्टयर्थ सर्व मूळ दस्ताऐवज, कागदपत्रांच्या सत्यप्रतीचा (Attested Photo copy) एक संच व लागू अर्ज शुल्क राज्यातील कोणत्याही अर्ज स्वीकृती केंद्रात (राज्यातील शासकीय वा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत) अर्ज निश्चितीसाठी सादर करावेत.

८. अर्ज स्वीकृती केंद्रामधील अधिकारी हे भरलेल्या ऑनलाईन अर्जाची छापिल प्रत (Print Out) व उमेदवाराने दिलेल्या मूळ दस्ताऐवजावरून काळजीपूर्वक छाननी करून तपासणी करतील. तपासणीनंतर अर्जाचे निश्चितीकरण करून उमेदवारास पावती वजा पोच (Receipt - cum - Acknowledgement) देतील.

९. उमेदवाराने एकच अर्ज करावा. एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास त्या उमेदवाराचे सर्व अर्ज रद्द होतील. अशा उमेदवारास प्रवेश देण्यात आला असल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल व उमेदवार संपूर्ण प्रवेशप्रक्रीयेतून बाद होईल.

१०. अनिवासी भारतीय व इतर राज्यातील रहिवासी असलेल्या उमेदवारांनी देखील दि. ५ जून, २०१५ पासूनच ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तसेच या उमेदवारांनी चौथ्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्याच्या वेळापत्रकानूसार व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करावेत.

**प्रवेश अर्ज शुल्क**

१. अराखीव प्रवर्ग उमेदवार (Unreserved Category) = रु. १५०/–
२. राखीव प्रवर्ग उमेदवार (Reserved Category) = रु. १००/–
३. महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार (Outside Maharashtra State) = रु. ३००/–
४. अनिवासी भारतीय उमेदवार (Non Residential Indian) = रु. ५००/–

### प्रवेशाचे वेळापत्रक

| अ. क्र. | प्रवेश फेरी | | तपशिल | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश अर्ज करणे | १.१ | ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरूस्ती करणे (Edit) व प्रवेश अर्ज पूर्ण भरल्यानंतर प्रवेश अर्जाची छापिल प्रत (Printout) घेणे. | ०५/०६/२०१५ स. ११.०० वाजेपासून | २४/०६/२०१५ सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| २. | प्रवेश अर्ज निश्चित करणे | २.१ | कागदपत्रांच्या तपासणीनंतर प्रवेश अर्ज शुल्क भरून, अर्ज निश्चित करणे. | ०८/०६/२०१५ स. ११.०० वाजेपासून | २५/०६/२०१५ सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| **पुढील प्रवेश प्रक्रियेबाबत वेळापत्रक लवकरच प्रकाशित करण्यात येईल.** | | | | | |

**टिप :–**

१. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांसाठी प्रवेश प्रक्रीयेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक शासकीय व खाजगी औ. प्र. संस्थांमध्ये दि. ०६/०६/२०१५ पासून ते प्रवेश अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत निःशुल्क मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आलेले आहे. सदर सत्राचा सर्व उमेदवारांनी लाभ घ्यावा. सर्व सुट्टीच्या दिवशी देखील मार्गदर्शन सत्र व प्रवेश प्रक्रिया सुरु राहील.

२. संपूर्ण प्रवेश प्रक्रियेबाबत उमेदवारांना वेळोवेळी SMS द्वारे कळविण्यात येईल तथापि उमेदवारांनी आपला अद्यावत भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile Number) ऑनलाईन प्रवेश अर्जात नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर भ्रमणध्वनी क्रमांक प्रवेशप्रक्रिये दरम्यान बदलू नये.

**महत्वाची सूचना :**

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ. प्र. संस्थांतील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने होत असून केंद्रीय पद्धतीत उपलब्ध जागा व संस्थास्तरावरील जागांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. खाजगी औ. प्र. संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागांसाठी (एकूण प्रवेश क्षमतेच्या व्यवसाय निहाय २०% जागा) व पाचव्या प्रवेश फेरीनंतर (समुपदेशन फेरी) खाजगी औ. प्र. संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागांसाठी देखील केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रणालीद्वारेच अर्ज सादर करणे आवश्यक आहे. सदर अर्ज **"Apply for Institute Level Seat at Private ITI"** या मथळ्याखाली http://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर **Candidate Login** मध्ये दि. २५/०६/२०१५ पासून उपलब्ध करून देण्यात येईल.

केंद्रीय पद्धतीत उपलब्ध जागांसाठी, खाजगी औ. प्र. संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागांसाठी (एकूण प्रवेश क्षमतेच्या व्यवसाय निहाय २०% जागा) व पाचव्या प्रवेश फेरीनंतर (समुपदेशन फेरी) खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागांसाठी दि. ०५/०६/२०१५ ते २५/०६/२०१५ या कालावधीत नोंदणी केलेलेच उमेदवार पात्र राहतील.

**कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही याची सर्व उमेदवार, पालक व औ. प्र. संस्थांनी नोंद घ्यावी.**

सही/–
डॉ. आर. आर. आसावा
प्र. संचालक (प्रशिक्षण)

स्थळ : मुंबई
दिनांक : ०५ जून, २०१५